# शिक्षण व क्रीडा समिती सभा दिनांक ०६ /०९/२०२४ ला झालेल्या सभेचे कार्यवृत्त

दिनांक ०६ / ०९ /२०२४ रोजी दुपारी १ . ०० वाजता शिक्षण व क्रीडा समितीची मासिक सभा मा. श्री रमेश काशीरामजी पारधी , सभापती शिक्षण व क्रीडा विषय समिती जिल्हा परिषद, भंडारा यांचे अध्यक्षतेखाली त्यांच्या कक्षात आयोजित करण्यात आली होती . सभेला हजेरी रजिस्टर मधील स्वाक्षरीनुसार सन्मा. समिती सदस्य , अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सचिव, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी उपस्थितांचे स्वागत करुन मा. अध्यक्ष यांच्या परवानगीने सभेला सुरुवात केली.

**विषय क्र. १ मागील सभेचे कार्यवृत्तातील मुद्यावर चर्चा करुन सभेचे कार्यवृत्त कायम करणे.**
मागील सभा दिनांक ०९/०८/२०२४ रोजी झालेल्या शिक्षण व क्रीडा समिती मासिक सभेचे कार्यवृत्त सभेचे सचिव तथा शिक्षणाधिकारी ( प्राथमिक), यांनी उपस्थित सदस्यांसमोर वाचन केले. मागील सभेचे कार्यवृत्तातील कार्यवाहीच्या मुद्यावर चर्चा करुन मंजुरी प्रदान करण्यात आली.

**विषय क्र. २ जिल्हा निधी योजनाचा मासिक खर्चाचा आढावा घेणे.**

जिल्हा निधी सन २०२४ - २५ जिल्हा निधी कार्यान्वीत योजनाचे जमा खर्चाची माहिती अंदाजपत्रकात योजना निहाय मंजूर तरतूद माहे सप्टेंबर २०२४ पर्यंत झालेला खर्च सादर करण्यात आला सदर खर्चावर सभेत चर्चा करण्यात आली.

शिक्षण विभाग (प्राथमिक) ,जिल्हा परिषद,भंडारा जिल्हा निधी योजनाचा मासिक खर्चाचा आढावा

| अ. क्रं. | लेखाशीर्ष | योजनेचे नांव | प्रथम सुधारीत अंदाजपत्रक जमा | माहे सप्टेंबर २०२४ पर्यत खर्च | शिल्लक |
|---|---|---|---|---|---|
| १ | १०१-०५ | गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करणे. | ७०००० | ० | ७०००० |
| २ | १०१-०५ अ | आदर्श शिक्षकांचा सत्कार करणे . | ४०००० | ० | ४०००० |
| ३ | १०१-१३ अ | शिक्षण विभाग जिल्हास्तरावर कार्यालयीन खर्च | ४००००० | ८५२० | ३९१४८० |
| ४ | १०१-१३ ब | शिक्षण विभाग तालुकास्तरावर कार्यालयीन खर्च | १७५००० | ० | १७५००० |
| ५ | १०१-१९ | **शैक्षणिक गुणवत्ता विकास कार्यक्रम राबविणे (मानधन)** | ४००००० | ० | ४००००० |
| ६ | १०१-२६-१ | जिल्हा स्तरावर विज्ञान प्रदर्शनी | ७५००० | ० | ७५००० |
| ७ | १०१-२६-२ | तालुका स्तरावर विज्ञान प्रदर्शनी | १४०००० | ० | १४०००० |
| ८ | १०१-२६-३ | जि. प. शाळांना विज्ञान साहित्य पुरविणे. | १०० | ० | १०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ९ | १०१-२७ | जि.प.माध्य/प्राथ. शाळा देखभाल दुरुस्ती व सौदर्यीकरण | १०० | ० | १०० |
| १० | १०१-२७ अ | जि.प. प्राथ.शाळां बांधकामे व पिण्याचे पाण्याची सुविधा उपलब्ध करुन देणे | २०००००० | ० | २०००००० |
| ११ | १०१-२७ ब | जि.प. प्राथ.शाळा देखभाल दुरुस्ती व इतर अनुषंगिक खर्चासाठी ५ टक्के तरतुद | १७३००००० | ६२३००० | १६६७७००० |
| १२ | १०१-२८ | इतर खर्च कोर्ट व वकील फी | ३०००० | ० | ३०००० |
| १३ | १०१-३४ | अपंग विद्यार्थ्यांचे विकास कौशल्य शिबिर आयोजीत करणे. | १०० | ० | १०० |
| १४ | १०२-१३ | माध्यमिक शाळे करीता कार्यालयीन खर्च | ७५००० | ० | ७५००० |
| १५ | १०२-५० | माध्य.शाळेतील शिक्षक कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते मानधन (तासिका प्रमाणे) | ५०००००० | २६१७३०६ | २३८२६९४ |
| १६ | १०२ | सेमी इंग्रेजी माध्यमाच्या प्राथमिक शाळा सुरु करणे. | १०० | ० | १०० |
| १७ | १०४-२० | शिक्षकांचे शिबीर आयोजीत करणे | ७०००० | ० | ७०००० |
| १८ | १०५-५० | प्राथमिक शाळांसाठी स्काऊट गाईड प्रशिक्षण | १०० | ० | १०० |
| १९ | ८०० | इतर खर्च | | ० | |
| २० | १ | जिल्हा स्तरावर क्रीडासत्र आयोजीत करणे | ३००००० | ० | ३००००० |
| २१ | २ | तालुका स्तरावर क्रीडासत्र आयोजीत करणे | ३५०००० | ० | ३५०००० |
| २२ | ३ | केंद्र स्तरावर क्रीडासत्र आयोजीत करणे | १०० | ० | १०० |
| २३ | ४ | राष्ट्रीय उत्सव व महाराष्ट्र दिन साजरा करणे | ४०००० | ० | ४०००० |
| २४ | ५ | माध्यमिक शाळे करीता फर्निचर ची व्यवस्था करणे. | ५०००००० | ० | ५०००००० |
| २५ | ६ | प्रशिक्षण कार्यक्रम आरएसपी | १०० | ० | १०० |
| २६ | ७ | प्राथमिक व माध्यमिक शाळांना पुस्तके खरेदी | ३०० | ० | ३०० |
| २७ | ८ | डेस्क- बेंच खरेदी | ५०००००० | ० | ५०००००० |
| २८ | ९ | चतुर्थ श्रेणी कर्मचारी गणवेश खरेदी | २०००० | ० | २०००० |
| २९ | १० | नाविन्यपूर्ण योजना(लाल बहादुर शास्त्री विद्यालय याचे बांधा, वापरा व हस्तांतरीत करा तत्वावरील कामे बीओटी) | १५०००००० | ० | १५०००००० |
| | | एकुण | ५१७५६००० | ३२४८८२६ | ४८५०७१७४ |

**विषय क्र.३:- पंचायत समिती स्तरावरील आढावा घेणे.**

मा.सभापती महोदयानी विचारले की विद्यार्थ्यांच्या गणवेशा करीता जिल्हा स्तरावर कापडाचे सॅम्पल येणे आवश्यक आहे.त्यानुसार सॅम्पल नुसार कापड प्राप्त झाला किंवा नाही यांची शहानिशा करणे सोयीचे होईल.

जिल्हा स्तरावरुन पंचायत समिती स्तरावर धान्यादी मालाचे सॅम्पल पुरविण्यात आले होते.त्यामध्ये चना,मुंगदाळ,मुग,मिरची,हळद या धान्यादी मालाच्या सॅम्पलमध्ये तफावत आहे.व मूग बारीक आहे. तसेच साकोली तालुक्याअंतर्गत काही शाळांमध्ये जाऊन जिल्हास्तरावरील चौकशी करण्यात आली.त्या चौकशी समितीला उपलब्ध झालेला धान्यादी मालाचे नमुने मा.शिक्षण संचालक (प्राथमिक), पुणे यांना पाठविण्यात यावे.

जिल्हा परिषदच्या अधिपत्याखालील असलेल्या शाळांना CCTV यंत्रणा बसविण्याकरिता जिल्हा निधी मध्ये अनुदान उपलब्ध नसल्याने DPC अंतर्गत अनुदान उपलब्ध करुन देण्याबाबतचे पत्र तयार करुन निधीची मागणी करण्यात यावी. तसेच खनिकर्म विभागास सुध्दा निधी उपलब्ध करुन देण्याबाबतचे पत्र मा. जिल्हाधिकारी, भंडारा यांना देण्यात यावे. असे मा.सभापती महोदयानी सभेत निर्देश दिले.

खाजगी अनुदानीत,विनाअनुदानित व स्वयंअर्थ सहायित शाळेत CCTV यंत्रणा बसविण्याची जबाबदारी ही संबंधित शाळा व्यावस्थापन व मुख्याध्यापकांची राहील.

शासन निर्णय दिनांक ५ सप्टेंबर २०२४ च्या शासन निर्णयात नमुद सेवानिवृत्त शिक्षकांना २० पटसंख्या असलेल्या व १ शिक्षकी शाळांमध्ये प्रती महिना १५०००/- (अक्षरी पंधरा हजार फक्त) मानधनावर घेण्याबाबतचे शासन निर्णय प्राप्त झाले असून सदर योजना राबविण्यासाठी सेवानिवृत्त शिक्षकांना घेण्याऐवजी सुशिक्षित बेरोजगार यांना प्रथम संधी देण्यात यावी असे शिक्षण विषय समितीमध्ये सर्वानुमते ठरविण्यात आले.

**विषय क्र.४:- क्रीडा विभागाचा आढावा घेणे.**

जिल्हा क्रीडा अधिकारी,भंडारा हे सदर सभेला हजर झाले नाही. अथवा त्यांचे प्रतिनिधी सुध्दा सभेला पाठविले नसल्याने जिल्हा क्रीडा विभागाचा आढावा घेण्यात आला नाही.

**विषय क्र.५:- शासकीय परिपत्रकाचे वाचन करणे**

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय दिनांक ०५ सप्टेंबर २०२४,च्या शासन निर्णयाचे विषय समिती सभेमध्ये वाचन करण्यात आले.

**विषय क्र.६:- समग्र शिक्षा अभियान, जिल्हा परिषद, भंडारा यांचा आढावा घेणे.**

समग्र शिक्षा अभियानातर्गत टॅब,टेबल डेस्क-बेंच इत्यादी साहित्य पुरविण्यात आले त्या साहित्याची तपासणी करण्यासाठी करारानुसार सॅम्पल पुरविण्यात आले नाही.त्यावर सभागृहात असे ठरविण्यात आले की, साहित्य निकृष्ठ दर्जाचे असुन सॅम्पल प्राप्त न झाल्यामुळे साहित्याचा दर्जा तपासता येत नाही.करिता जिल्हयाचे ना हरकत प्रमाणपत्र घेतल्या शिवाय देयके अदा करण्यात येऊ नये .याबाबत शिक्षणाधिकारी(प्राथमिक)यांनी समग्र शिक्षा अभियानांतर्गत प्राप्त साहित्यांची देयके जिल्हास्तरावरुन अदा करण्यात येत नाहीत,असे सांगितले.

**विषय क्र.७ :- मा. अध्यक्षांच्या परवानगीने वेळेवर येणारे विषय.**

**विषय क्र.७.१ :-प्रधानमंत्री शालेय पोषण आहार योजना अंतर्गत प्राप्त धान्यादी मालाचे सर्व सॅम्पल तपासणीसाठी शिक्षण संचालक,(प्राथमिक) पुणे येथे पाठविण्याबाबत.**

**ठराव क्र.७.१:-**प्रधानमंत्री शालेय पोषण आहार योजना अंतर्गत प्राप्त धान्यादी माल जसे चना,मुग,मुगदाळ,मिरची,हळद हे धान्यादी माल सॅम्पल नुसार प्राप्त होत नाही.त्यामध्ये तफावत आहे.असे शिक्षण समितीने ठरविले ,त्यामुळे समितीमध्ये पंचायत समिती,साकोली अंतर्गत शाळास्तरावरील सॅम्पल शिक्षण समितीमध्ये दाखविण्यात आले.सदर सॅम्पल शिक्षण संचालक (प्राथमिक) पूणे येथे पाठविण्यात यावे ,शिक्षण संचालक (प्राथ) पूणे,यांच्याकडून सॅम्पल बाबत अहवाल प्राप्त झाल्यानंतरच माहे मार्च ,एप्रिल २०२४ च्या कालावधीतील देयके अदा करावे असे शिक्षण व क्रीडा विषय समिती सभेमध्ये सर्वानुमते ठरविण्यात आले.

**ठराव क्रमांक ७.१ सर्वानुमते मंजुर**

**विषय क्र.७.२:- सन २०२३-२४ जिल्हा निधी लेखाशिर्ष २२०२-१०१-२७Bअंतर्गत प्राप्त अनुदानातुन जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,ब्राम्हणटोला दुरुस्तीचे मंजुर झालेले काम रद्द करण्याबाबत.**

**ठराव क्र.७.२:-** सन २०२३-२४ जिल्हा निधी लेखाशिर्ष २२०२-१०१-२७ B अंतर्गत प्राप्त अनुदानातुन जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,ब्राम्हणटोला दुरुस्ती करिता रुपये २.०० लक्ष अनुदान प्राप्त झाले होते.सदर कामाला प्रशासकिय मंजुरी प्रदान करण्यात अली होती.सदर शाळेत कामाला सुरुवात न झाल्यामुळे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,ब्राम्हणटोला ता.तुमसर २.०० लक्ष चे दुरुस्तीच्या काम रद्द करण्यात येत आहे. शिक्षण व क्रीडा विषय समितीमध्ये सर्वानुमते मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

**ठराव क्रमांक ७.२ सर्वानुमते मंजूर**

**विषय क्र.७.३:- सन २०२४-२५ जिल्हा निधी लेखाशिर्ष २२०२-१०१-२७ B अंतर्गत प्राप्त अनुदानातुन जिल्हा परिषद प्राथमिक शाळा दुरुस्ती करण्याबाबत.**

**ठराव क्र.७.३:-** सन २०२४-२५ जिल्हा निधी लेखाशिर्ष २२०२-१०१-२७ B अंतर्गत प्राप्त अनुदानातुन जिल्हा परिषद प्राथमिक शाळा दुरुस्ती करण्याकरीता शिक्षण व क्रीडा समिती च्या सन्मानिय सदस्यानी सुचविल्यानुसार खालील प्रमाणे कामांना मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पं.स. नांव | शाळेचे नांव | कामाचे नांव | मंजुर रक्कम (लाखात) |
|---|---|---|---|---|
| १ | तुमसर | जि. प.हायस्कुल शाळा,देव्हाडी | पेंव्हीग ब्लॉक | ८.०० |
| २ | तुमसर | जि. प.प्रा.शाळा, बिनाखी | शाळा दुरुस्ती करणे | ४.०० |
| ३ | मोहाडी | जि. प.प्रा.शाळा,पांजरा ग्राम | शाळा दुरुस्ती करणे | ५.०० |
| ४ | तुमसर | जि.प.प्रा.शाळा,मोहाडी/खापा | शाळा दुरुस्ती करणे | ५.०० |

वरील कामांना शिक्षण व क्रीडा विषय समितीमध्ये सर्वानुमते मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

**ठराव क्रमांक ७.३ सर्वानुमते मंजूर**

**विषय क्र.७.४ :- लेखाशिर्ष २२०२ के २७५ व २२०२ के ६२२ चे अनुदान लेखाशिर्ष २२०२ जे ९३१ ला वळती करण्याबाबत.**

**ठराव क्र.७.४ :-** जिल्हा परिषद क्षेत्रातील प्राथमिक माध्यमिक शाळेची इमारत व वर्गखोली बांधकाम (लेखाशिर्ष २२०२ जे ९३१ ) वर ६०० लक्ष नियत्वय मंजुर असून दिनांक १३/०८/२०२४ ला गरजा समिती मध्ये सन २०२३-२४ चे स्पिल वजा करुन उर्वरित निधीचे दिडपट कामाना मंजुरी प्रदान करण्यात आली होती.परंतु सन २०२०-२१ चे १९ मंजुर कामाचे रुपये १५८.०० लक्ष देयके अदा करण्याकरीता या अनुदानातुन खर्ची करण्याचे नियोजन कार्यालयाकडून निर्देश असल्यामुळे आदर्श शाळा विविध पायाभुत सुविधा निर्माण करणे ,व विज्ञान प्रयोगशाळा व संगणक प्रयोग शाळा,डिजिटल शाळा या लेखाशिर्षावर उपलब्ध असलेला नियन्वय जिल्हा परिषद क्षेत्रातील प्राथमिक व माध्यमिकशाळांची इमारत,वर्ग खोली बांधकामावर वळती करण्याबाबत चर्चा करण्यात आली ,त्यामध्ये अतिवृष्टी व पुर परिस्थितीमुळे बऱ्याच शाळाची गैरसोय होत असल्यामुळे सन्मा. जिल्हा परिषद सदस्य यांच्या भावना लक्षात घेऊन (लेखाशिर्ष २२०२ के २७५ मध्ये रुपये ४३.४५ लक्ष ,व लेखाशिर्ष २२०२ के ६२२ मध्ये रुपये १२५.०० लक्ष या नियतव्यय मधून ३४.०० लक्षाचे स्पिल वजा करुन उर्वरित ९१ .०० लक्ष रुपये जिल्हा परिषद क्षेत्रातील प्राथमिक व माध्यमिकशाळांची इमारत,वर्ग खोली बांधकामावर वळती करण्याबाबत शिक्षण व क्रीडा समिती मध्ये सर्वानुमते मंजुरी प्रदान करण्यात आली.

**ठराव क्रमांक ७.४ सर्वानुमते मंजूर**

मा.सभापती महोदयांनी ज्या सूचना केल्या आहेत.तसेच काही मुद्यावर कार्यवाही करण्याचे सुचविले आहे, त्याची सर्व गटशिक्षणाधिकारी यांनी नोंद घ्यावी व पत्राची वाट न पाहता पूर्तता करुन अनुपालन कार्यालयास सादर करावा.असे निर्देश शिक्षणाधिकारी(प्राथमिक) यांनी दिले. श्री. वंजारी, उपशिक्षणाधिकारी (प्राथ)जि.प.भंडारा यांनी उपस्थितांचे आभार मानून मा.सभापती महोदयांच्या परवानगीने सभा संपल्याचे जाहीर केले.

( रवींद्र सोनटक्के )
शिक्षणाधिकारी तथा सचिव
शिक्षण व क्रीडा विषय समिती
जिल्हा परिषद,भंडारा

(रमेश पारधी)
सभापती
शिक्षण व क्रीडा विषय समिती
जिल्हा परिषद,भंडारा

**स्थानिक स्वराज्य संस्थांच्या १० व १० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळेत डीएड, बीएड अर्हता धारक बेरोजगार उमेदवार यांना कंत्राटी तत्वावर नियुक्त करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण- २०२४/प्र.क्र.६६६ /टिएनटि-१**
चौथा मजला, विस्तार इमारत
हुतात्मा राजगुरु चौक मादाम कामा मार्ग,मंत्रालय, मुंबई ४०००३२
दिनांक: २३ सप्टेंबर २०२४.

**वाचा**:- १) शासन पत्र क्र.संकीर्ण २०२३/प्र.क्र.३६२/टिएनटि-१, दि.०७.०७.२०२३.
२) शासन निर्णय क्र.एसएसएन २०१५/(प्र.क्र.१६/१५)/टीएनटी-२, दि.१५.०३.२०२४.
३) शासन पत्र क्र. संकीर्ण २०२४/प्र.क्र.४१४/टिएनटि-१, दि.१५.०७.२०२४.
४) शासन निर्णय क्र.संकीर्ण २०२४/प्र.क्र.६६६/टिएनटि-१, दि.०५.०९.२०२४.

**प्रस्तावना**:-

राज्यात १० व १० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळांमध्ये नियुक्त करावयाच्या दोन शिक्षकांपैकी एक शिक्षक हा सेवा निवृत्त शिक्षक नियुक्त करावयाची तरतूद करण्यात आली आहे. यानुसार कमी पटसंख्या असलेल्या सर्वच शाळांना सेवानिवृत्त शिक्षक उपलब्ध होतील असे नाही. तसेच राज्यात डीएड व बीएड अर्हता धारक पात्र बेरोजगार उमेदवारांची संख्या मोठ्या प्रमाणात असताना सेवानिवृत्त शिक्षकांची नियुक्ती करणे उचित होणार नाही. यास्तव अशा ठिकाणी संधी दिल्यास शिक्षकांचे पद रिक्त न राहता विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही. तसेच डीएड व बीएड अर्हता धारक पात्र बेरोजगार उमेदवारांना शिक्षकीय पदावर काम करण्याची संधी प्राप्त होईल. यास्तव १० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळेमध्ये डीएड बीएड अर्हता धारक पात्र उमेदवारांना नियुक्ती देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय**:-

स्थानिक स्वराज्य संस्थांमधील २० व २० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळांमधील मंजूर करण्यात आलेल्या दोन शिक्षकांपैकी एक शिक्षक सेवानिवृत्त शिक्षक किंवा डीएड, बीएड अर्हताधारक बेरोजगार शिक्षक यांमधून नियुक्त करण्याबाबत निर्गमित करण्यात आलेला उपरोक्त वाचा क्र.४ येथील शासन निर्णय दि.०५.०९.२०२४ या निर्णयान्वये अधिक्रमित करण्यात येत आहे.

**०२.** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या १० व १० पेक्षा कमी पटंसख्या असलेल्या शाळांमध्ये मंजूर करण्यात आलेल्या दोन शिक्षकांपैकी एका पदावर डीएड, बीएड अर्हताधारक बेरोजगार शिक्षक उमेदवाराची नियुक्ती करण्यात यावी. याबाबतच्या सर्वसाधारण तरतूदी पुढीलप्रमाणे विहीत करण्यात येत आहेत:-

**१.** सदर नियुक्तीसाठी शासन नियमानुसार किमान व कमाल वयोमर्यादा लागू राहील.

**२.** डी.एड, बीएड अर्हताधारक बेरोजगार उमेदवारांना करार पध्दतीने कंत्राटी तत्वावर नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधितास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाचे/ सामावून घेण्याचे व नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार/ हक्क नसेल.

**३.** सुरुवातीला नियुक्तीचा कालावधी एका शैक्षणिक वर्षासाठी असेल. परंतु त्यानंतर गुणवत्ता व योग्यतेच्या आधारावर आवश्यकतेनुसार सदर नियुक्तीचे वाढीव कालावधीकरीता दरवर्षी नुतनीकरण करता येईल.

**४.** मानधन रु.१५,०००/- प्रतिमाह (कोणत्याही इतर लाभांव्यतिरीक्त)

**५.** एकूण १२ रजा देय (एकूण देय रजेपेक्षा जास्त रजा ह्या विनावेतन असतील).

**६.** कोणतेही प्रशासकीय अधिकार नसतील.

**७.** जिल्हा परिषदेच्या वतीने शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्याशी करारनामा स्वाक्षरीत करणे आवश्यक राहील.

**८.** बंधपत्र/हमीपत्र: नियुक्तीच्या कालावधीत करार पध्दतीने शिक्षकीय पदाचे विहीत काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित व्यक्तीची राहील, या आशयाचे बंधपत्र/हमीपत्र घेण्यात यावे. बंधपत्र/हमीपत्रामध्ये करार पध्दतीने नियुक्ती देताना शासनाने विहित केलेल्या अटी व शर्ती, विभागाने निश्चित केलेल्या अतिरिक्त अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचा तसेच करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींकडून नियमित सेवेत घेण्याबाबत अथवा इतर कोणत्याही हक्काची मागणी करण्यात येणार नाही व सक्षम प्राधिकारी यांनी विशेष परिस्थितीमध्ये कोणत्याही वेळी करारनाम्यामध्ये उल्लेखित कालावधी संपण्यापूर्वी करार पध्दतीवरील सेवा समाप्त केल्यास त्यास हरकत/आक्षेप राहणार नाही, याचा देखील उल्लेख करण्यात यावा.

**९.** अध्यापनाचे तास इतर नियमित शिक्षकांप्रमाणे असतील.

**१०.** प्रत्येक जिल्ह्यासाठी संबंधित शिक्षणाधिकारी (प्राथमिक) व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी पात्र व इच्छुक उमेदवारांमधून आवेदनपत्र मागवून नियुक्ती आदेश द्यावेत.

**११.** सदर प्रक्रियेसंदर्भात आवश्यकतेनुसार आयुक्त (शिक्षण) यांनी अतिरिक्त सूचना निर्गमित कराव्यात.

**१२.** नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांना विशेष परिस्थीतीसाठी कोणत्याही वेळी अशा करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.

**१३.** करार पध्दतीने नियुक्त करावयाचा शिक्षक शारिरिक, मानसिक व आरोग्याच्या दृष्टीने सक्षम नसल्याचे व प्रस्तावित सेवेसाठी त्याच्याकडे आवश्यक क्षमता नसल्याचे निदर्शनास आल्यास त्यांची कंत्राटी सेवा समाप्त करण्यात यावी.

**१४.** करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्रे/माहिती व आधारसामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील.

**१५.** करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींना त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील. त्यांच्या कामकाजाबाबत नियुक्तीसाठी सक्षम असलेले प्राधिकारी वेळोवेळी आढावा घेऊन कामाचे मुल्यमापन करतील. सदर मूल्यमापनात कंत्राटी

शिक्षकाचे काम समाधानकारक नसल्याचे निदर्शनास आल्यास त्याची कंत्राटी तत्वावरील सेवा समाप्त करण्यात येईल.

**१६.** शाळेची पटसंख्या १० पेक्षा जास्त झाल्यास कंत्राटी तत्वावर नियुक्त करण्यात आलेले डी.एड व बीएड अर्हताधारक कंत्राटी शिक्षकाची सेवा नियमित शिक्षकाची नियुक्ती होईपर्यंत सुरु राहील. नियमित शिक्षकांची नियुक्ती झाल्यानंतर कंत्राटी शिक्षकाची सेवा आपोआप संपूष्टात येईल.

**१७.** करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती, सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल, अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतलेली नसावी.

**१८.** करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीने गुंतलेले हितसंबंध जाहीर करणे आवश्यक राहील.

**१९.** ज्या १० व १० पेक्षा कमी पटसंख्येच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये कार्यरत दोन नियमित शिक्षकांपैकी एका शिक्षकाची प्राथम्याने जास्त पटसंख्या असलेल्या शाळेत समुपदेशनाने बदली करण्यात यावी. यामध्ये दोन्ही नियमित शिक्षकांची इच्छूकता घेण्यात यावी. जर दोन्ही शिक्षक बदलीने जाण्यास इच्छूक असतील तर सेवाज्येष्ठ शिक्षकास प्राधान्य देण्यात यावे. तसेच दोन्ही नियमित शिक्षक बदलीने जाण्यास इच्छूक नसल्यास सेवा कनिष्ठ शिक्षकाची बदली करण्यात यावी. तथापि, कंत्राटी शिक्षक मिळेपर्यंत नियमित शिक्षकाची बदली करण्यात येऊ नये.

**२०.** कंत्राटी तत्वावर नियुक्त झालेल्या अशा शिक्षकांवर लगतचे नियंत्रण केंद्रप्रमुखांचे असेल. त्यानंतर गट शिक्षण अधिकारी व शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांचे नियंत्रण असेल.

**२१.** संदर्भीय शासन पत्र, दि.०७.०७.२०२३ व शासन पत्र, दि.१५.०७.२०२४ अनुसार दिलेल्या मार्गदर्शक सूचना यापुढे १० पेक्षा जास्त पटसंख्या असलेल्या शाळांना लागू राहतील. यासाठी देण्यात येणारे मानधन सदर शासन निर्णयाच्या दिनांकापासून रु. १५,०००/- एवढे राहील.

**२२.** सदर बाबींवर होणारा खर्च मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

**२३.** सदर शासन निर्णयातील तरतूदी केवळ स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांना लागू राहतील.

**०३.** सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२४०९२३१७१०३००८२१ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

TUSHAR VASANT MAHAJAN

Digitally signed by TUSHAR VASANT MAHAJAN
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SCHOOL EDUCATION AND SPORTS DEPARTMENT, 2.5.4.20=19c6c23f510a80926e9b7ee5db235979452f3f9e8918118 4069a6cc7a22b9f, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=1A39CEF3C157B9EE6A2ABE5779ACF23368261 3F7 C335D6BF4877267695CECA, cn=TUSHAR VASANT MAHAJAN
Date: 2024.09.23 17:12:40 +05'30'

**(तुषार महाजन)**
**उप सचिव, महाराष्ट्र राज्य**

**प्रत,**

१) मा. राज्यपाल महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, मलबार हिल, मुंबई.
२) मा. सभापती/ उपसभापती महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.